पोस्टाने पाठविण्याचा परवाना क्र. एन.एस.के./ ५५/२०२४-२६ आर.एन.आय. नंबर : १८९१८/१९७०.



## थोडक्यात

### टीम इंडियाच्या ड्रेसिंग रुममध्ये बहिष्काराचे वारे

**दुबई ।** दुबईमध्ये आशिया कपमध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात 'हाय वोल्टेज' क्रिकेट सामना होणार यावरून घमासान चर्चा सुरू होती. भारताच्या ड्रेसिंग रूममध्येही पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यावर बहिष्काराचे वारे वाहत असल्याची माहिती समोर आली. पाकिस्तानविरुद्ध खेळावे की नाही, असा संभ्रम भारतीय क्रिकेटपटूंसमोर होता. प्रशिक्षक गौतम गंभीर आणि इतर स्टाफसोबत खेळाडूंची चर्चा झाली. या चर्चेत खेळाडूंना 'व्यावसायिक रहा आणि मॅचकडे मॅच म्हणून पहा' असा सल्ला देण्यात आला खेळाडूंना हा सामना केवळ एक खेळ म्हणून खेळण्यास सांगितले आहे. जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाल्यानंतर दोन्ही देशांमधील संबंध बिघडले आहेत. त्यामुळे भारतातून अनेकांनी पाकिस्तानविरुद्धचा सामना रद्द करण्याची मागणी केली होती.

### त्यांच्याशी का खेळावे : नाना

मुंबई । नाना पाटेकर यांनी भारत-पाक सामना खेळण्याला विरोध दर्शवला. या भूमिकेवर बोलताना, 'माझ्या लोकांचे रक्त सांडलेले आहे, त्याच्याशी का खेळावे आपण?' असे मत त्यांनी व्यक्त केले. ही केवळ वैयक्तिक भूमिका असल्याचे स्पष्ट करण्यात आले. लोकांच्या भावना आणि देशाची परिस्थिती लक्षात घेऊन निर्णय घेण्याची गरज यातून अधोरेखित होत असल्याची चर्चा रंगली होती.

# भारताचा पाकिस्तानवर सर्जिकल स्ट्राईक

## मैदानातही 'ऑपरेशन सिंदूर' यशस्वी ; सात गडी राखून विजय

**दुबई । वृत्तसंस्था**





दुबईत खेळल्या गेलेल्या आशिया कपच्या 'हाय व्होल्टेज' सामन्यात टीम इंडियाने सुर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली पाकिस्तानला धूळ चारली. मैदानातही 'ऑपरेशन सिंदूर' यशस्वी करत भारताने पाकिस्तानवर सर्जिकल स्ट्राइक केला.

रविवारी झालेल्या या रोमांचक लढतीत भारताच्या खेळाडूंनी सर्व विभागात उत्कृष्ट कामगिरी करत पाकिस्तानवर एकतर्फी मात केली. आधी भारतीय गोलंदाजांनी पाकिस्तानचा डाव अक्षरशः उद्ध्वस्त केला. कुलदीप यादव आणि अक्षर पटेल यांनी अचूक आणि जबरदस्त माऱ्याने पाकिस्तानला केवळ १२७ धावांवर रोखले. यानंतर भारताच्या फलंदाजांनी सामन्याचा निकाल जवळपास निश्चित केला. अभिषेक शर्मा, तिलक वर्मा आणि कर्णधार सुर्यकुमार यादव यांनी आक्रमक फलंदाजी करत विजय सोपा केला. त्यांच्या दमदार खेळीमुळे भारताने सहज विजय मिळवला. या विजयामुळे टीम इंडिया आता ग्रुप 'ए'च्या पॉइंट्स टेबलवर टॉपर आहे.

टॉस जिंकून पाकिस्तानचा कर्णधार सलमान आगा याने प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला, मात्र हा निर्णय पूर्णपणे चुकीचा ठरला. पाकिस्तानची टीम ऑलआउट होण्यापासून जरी वाचली, तरी ९ गडी गमावून फक्त १२७ धावांचाच आकडा गाठू शकली. सामन्याच्या पहिल्याच चेंडूवर पाकिस्तानचा पहिला विकेट पडला आणि तिथून सुरू झालेली विकेट्सची पडझड थांबायलाच तयार नव्हती. पाकिस्तानकडून सर्वाधिक धावा सलामीवीर साहिबजादा फरहानने केल्या. त्याने ४४ चेंडूत ४० धावा करताना काही वेळ पाकिस्तानला सावरायचा प्रयत्न केला, पण अखेर तो कुलदीप यादवच्या फिरकीत फसला. याशिवाय पाकिस्तानच्या दोन फलंदाजांना शून्यावर माघारी परतावे लागले. एक वेळ अशी आली होती की १०० धावांचा टप्पा पार करणेही कठीण वाटत होते. मात्र, अखेरच्या टप्प्यात शाहीन शाह आफ्रिदीने फटकेबाजी करत १६ चेंडूत ३३ धावा ठोकल्या आणि आपल्या संघाला कसाबसा बचाव करता येईल असा टप्पा गाठून दिला.




आशिया चषक २०२५

### भारतीय गोलंदाजांची धडाकेबाज कामगिरी

भारतीय गोलंदाजांनी जबरदस्त कामगिरी करून पाकिस्तानची कोंडी केली. हार्दिक पांड्या आणि जसप्रीत बुमराह यांनी सुरुवातीच्या दोन षटकांतच दोन बळी घेत पाकिस्तानला दबावाखाली ढकलले. त्यानंतर कुलदीप यादवने आपल्या स्पेलमध्ये फक्त १८ धावा देत ३ गडी टिपले. जसप्रीत बुमराह आणि अक्षर पटेल यांनी प्रत्येकी २ बळी घेतले, तर हार्दिक पांड्या आणि वरुण चक्रवर्ती यांच्या खात्यात १-१ विकेट जमा झाली.

भारताने विजयासाठी दिलेल्या १२८ धावांचा पाठलाग आक्रमक अंदाजात केला आहे. अभिषेक शर्माने पहिल्याच चेंडूपासून पाकिस्तानी गोलंदाजांना आसमान दाखवले. शाहीन आफ्रिदीच्या ओव्हरमध्ये अभिषेकने एक चौकार आणि एक षटकार लगावला. एका षटकानंतर भारताचा स्कोर कोणत्याही विकेटशिवाय १२ धावा इतका झाला. पण, यानंतर सॅम अयुबवर सलग दोन चौकार ठोकल्यानंतर शुभमन गिल मात्र जास्त वेळ टिकू शकला नाही. सॅम अयुबनेच गिलला स्टंपिंग करून माघारी धाडले. गिलने सात चेंडूत १० धावा केल्या. भारताला पहिला धक्का २२ धावांवर बसला.

### पहिल्या चेंडूवर विकेट

भारत-पाकिस्तान सामना एका विकेटने सुरू झाला. हार्दिक पंड्याने सामन्याच्या पहिल्या अधिकृत चेंडूवर ० च्या स्कोअरवर सॅम अय्युबला आऊट केले. आशिया कप २०२५ मध्ये सलग दुसऱ्यांदा अय्युब गोल्डन डकचा बळी ठरला. पुढच्याच षटकात जसप्रीत बुमराहने मोहम्मद हरिसला ३ धावांवर बाद केले. ओमानविरुद्ध ६३ धावा करणारा मोहम्मद हरिस आणि कर्णधार सलमान आगा देखील अपयशी ठरले.

एकेकाळी पाकिस्तान संघाने १३ षटकांत ६५ धावांत ६ विकेट गमावल्या होत्या, पण टेल-एंड फलंदाजांनी कसा तरी संघाचा स्कोअर १२० च्या पुढे नेला. एकेकाळी १०० धावा करणेही त्यांना कठीण वाटत होते. फहीम अश्रफने ११ धावा आणि सुफियान मुकीमने १० धावा केल्या. या छोट्या खेळींमुळे पाकिस्तानला सन्मानजनक धावसंख्या गाठता आली.

शाहीन आफ्रिदी १७ व्या षटकात फलंदाजीला आला, त्यावेळी पाकिस्तान संघाने ८३ धावांवर सातवा विकेट पडला होता. धावगती सुमारे ५ धावांवर होती, त्यामुळे पाकिस्तानसाठी १२० धावांची धावसंख्या जवळजवळ अशक्य वाटत होती. येथून शाहीन आफ्रिदीने १६ चेंडूत ३३ धावांची तुफानी खेळी खेळून पाकिस्तान संघाची लाज राखली. आफ्रिदीने त्याच्या डावात ४ गगनचुंबी षटकार मारले

# सरकारविरोधात दोन मोर्चे काढणार : वडेट्टीवार

**पुणे । वृत्तसंस्था**

पुण्यात काँग्रेसच्या ओबीसी सेलची बैठक पार पडली असून, विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर जोरदार टीका केली आहे. मुख्यमंत्री फडणवीस हे मराठा व ओबीसी समाजाची फसवणूक करत असल्याचा आरोप त्यांनी केला. ओबीसी आरक्षणाचे संरक्षण धोक्यात असल्याचा मुद्दा मांडत पुढील काळात ओबीसी समाजाकडून दोन मोर्चे काढण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

राज्यात आरक्षणाच्या मुद्द्यावर अशी ही बनवाबनवी चित्रपट सुरू असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मराठा व ओबीसी समाजाची बनवाबनवी करत आहेत, अशी टीका काँग्रेसचे ज्येष्ठनेते विजय वडेट्टीवार यांनी रविवारी पुण्यात केली. मराठा समाजाला इतर मागास प्रवर्गातून (ओबीसी) आरक्षण देण्यासाठी हैदराबाद गॅझेटची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य सरकारने दबावापोटी मराठा आरक्षणाबाबत शासन निर्णय काढला आहे. त्या पार्श्वभूमीवर काँग्रेसच्या ओबीसी सेलतर्फे पुण्यात काँग्रेस भवन येथे ओबीसी संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक घेण्यात आली. पक्षाच्या ओबीसी विभागाचे अध्यक्ष अनिल जयहिंद, आमदार वडेट्टीवार व सतेज पाटील, सेलचे राज्य अध्यक्ष भानुदास माळी यांच्यासह पक्षाचे सर्व पदाधिकारी माजी आमदार व माजी नगरसेवक उपस्थित होते. या बैठकीनंतर विजय वडेट्टीवार व अनिल जयहिंद यांनी पत्रकारांशी संवाद साधताना राज्य सरकारवर टीकेची झोड उठवली.

# कोणता मराठा सुखी ठेवला? : जरांगे

**जालना ।** मनोज जरांगे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवारांवर टीका केली आहे. अजित पवारांवर बोलताना जरांगेंनी भुजबळांचा अलिबाबा असा उल्लेख केला. जरांगे यांनी अजित पवार यांना 'कोणता मराठा तुम्ही तुम्ही सुखी ठेवला?' असा सवाल केला. सरकार म्हणून कुणालाही नाराज करायचे नाही, अशी भूमिका अजित पवारांनी मांडली होती. यावर जरांगे यांनी 'अन्याय होईल तर का राहील? असून दिले नाही तेव्हा अन्याय होतो.' असे प्रत्युत्तर दिले.

परळीच्या लाभार्थी टोळीला बोलता येत नसल्याने त्यांनी आता इतरांना हाताला धरुन मराठ्यांविरोधात उभे केलेय. ज्यांच्या आरक्षणाला काहीच धक्का लागणार नाही अशा गरीब धनगर आणि वंजारी समाजाला मराठ्यांच्या विरोधात भडकवल्याचा आरोप मनोज जरांगे यांनी केला. मनोज जरांगे यांनी यावेळी माजीमंत्री धनंजय मुंडे यांचे नाव न घेता टीका केली. त्याचा एक डोळा चष्म्यातून बाहेर येत आहे, गरिबांचे वाटोळे करण्याची बेक्कार फेड असते असा टोलाही जरांगे यांनी लगावला.




देशदूत
हे दैनिक मुद्रक व प्रकाशक **राजेंद्र कृष्णराव सोनवणे** यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि. यांच्याकरिता प्लॉट क्र. बी ६४, नाईस, सातपूर, नाशिक - ४२२००७ येथे मुद्रित करून देशदूत कार्यालय, काँग्रेस हाऊस, म.गांधी रोड, नाशिक येथे प्रसिद्ध केले.
● संपादक : **हेमंत दिनेश अलोने.** ● सल्लागार संपादक : ✽ **शैलेंद्र माणिकराव तनपुरे** (✽ पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) ☎ : शहर- ०२५३-२५७५७१६, २५७२४०० ● नाशिकरोड कार्यालय :०२५३-२९४२२०३
● मालेगाव कार्यालय फोन: ०२५५४-२९९२०३ ● सिन्नर फोन: ०२५५१-२९९२०३, ● दिंडोरी फोन : ०२५५७-२२२८८८ ● निफाड फोन : ०२५५७-२९९६९६.
● Mail id : ceditor@deshdoot.com

cmyk